REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अथ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १२ एप्रिल, १९५० | अंक १५


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी.
श्री. बा. ग. धंद्रुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

ता. १-५-५० पासून पुणें कचेरीचें ऑफिस ३६१-६२, बुधवार पेठ, येथें जाणार आहे.

पुणें कचेरी
५१५ बुधवार

अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५११ | तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना**
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः—**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेल, लांकूड आणि कोळसा वगैरे.





## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी   २ डाळीची गिरणी   ३ उसाचे चरक
४ चक्क्या   ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां)   ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड**

भिवंडी   जि. ठाणें

व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**सौराष्ट्रांत सहकारी बँक**—सौराष्ट्र राज्याचें सरकार आपल्या राज्यांत एक मध्यवर्ती प्रांतिक सहकारी बँक काढण्याचा विचार करीत आहे. ग्रामीण भागांतील लोकांना सहकारी कामकाजासाठी कर्ज देणें हा ह्या नव्या बँकेचा उद्देश आहे.

**नव्या भांडवलाची उभारणी**—१९४७–४८ सालीं एकूण १६२·६४ कोटी रुपये नवें भांडवल उभारण्याची परवानगी भारतीय सरकारनें दिली. १९४८–४९ सालीं हा आंकडा ११७·११ कोटी रुपयांचा आणि १९४९–५० सालीं ५१·७७ कोटी रुपयांचा आहे. १९४७ व ४८ सालीं मिळून ५७७ कंपन्यांना २२०·२२ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली होती. पण ८९·७७ कोटी रुपयांचेंच भांडवल जमा झालें.

**रक्तदानासाठी विनंति**—दिल्लीमधील ब्लड बँकेनें प. बंगालमधील रुग्णांना २,००० वेळां पुरेल इतकें रक्त देण्याचें कबूल केलें आहे. ह्या संस्थेला नागरिकांनीं पैशाची आणि रक्तदानाची मदत करावी अशी विनंति कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ. पट्टाभी सीतारामय्या ह्यांनीं केली आहे.

**आसाममध्यें अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ**—आसाम राज्यांतील गॅरो टेकड्यांवरील अरण्यांत दुर्मिळ अशा औषधी वनस्पति आहेत असें म्हणतात. अशा औषधींचें आणि पक्षांचें संशोधन करण्यासाठी कांहीं अमेरिकन शास्त्रज्ञ आसामांत तळ ठोकून आहेत. झाडांचीं पानें, साली व पक्षी अशा अनेक चिजा हे शास्त्रज्ञ सध्या अमेरिकेला पाठवीत आहेत.

**इराणमधील तेलासाठी सवलती मिळणार नाहींत**—इराणमधील तेल अगर इतर कच्चा माल ह्यांचें उत्पादन करण्याच्या सवलती ह्यापुढें कोणत्याही परकीय देशाला मिळणार नाहींत, असें इराणच्या शहांनीं जाहीर केलें आहे. अबादान येथील अँग्लो–इराणिअन ऑइल कंपनीच्या सवलती मात्र यथापूर्व चालू रहाणार आहेत. अजून ह्या कंपनीच्या कराराचीं ४५ वर्षें शिल्लक आहेत.

**सावंतवाडीला अकौंटन्सीचे वर्ग**—सावंतवाडी येथील कळसुलकर हायस्कूलमध्यें अकौंटन्सी आणि बुककीपिंग ह्या शिक्षणवर्गाचें उद्‌घाटन, रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर श्री. वामनराव वर्दे ह्यांच्या हस्तें करण्यांत आलें. स्थानिक कोऑपरेटिव्ह बँकेचे श्री. नावर हा नवीन विषयाचा वर्ग चालविणार आहेत.

**सायकलींची आयात**—मे १९४९ पासून भारतीय सरकारनें परदेशांतून सायकली आणण्यास मनाई केली. त्यामुळें देशांत सायकलींचा तुटवडा पडला आहे, असें सायकली आयात करणाऱ्या मुंबईतील व्यापाऱ्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें, देशी सायकलींचें वार्षिक उत्पादन ७२,००० पेक्षा अधिक नाहीं. उलट, मागणी मात्र ६ लाख सायकलींची आहे. तेव्हां देशांतील उत्पादन मागणीइतकें वाढेतोंपर्यंत वरील फरक आयातीनेंच भरून काढला पाहिजे अशी सूचना त्यांनीं सरकारला केली आहे.

**रशिआ–चीन ह्यांची संयुक्त कंपनी**—रशिआ आणि चीन ह्या दोन देशांनीं नागरी विमान वहातूक करणारी एक संयुक्त कंपनी काढण्याचें ठरविलें आहे. कंपनीचें भांडवल आणि व्यवस्था ह्यांत दोन्ही राष्ट्रांचा सारखाच भाग रहाणार आहे. चीनच्या नागरी विमान वहातुकीची वाढ करणें आणि दोन्ही राष्ट्रांतील आर्थिक संबंध दृढ करणें, असा ह्या कंपनीचा हेतू आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाकडून अधिक पुस्तकें**—भारत सरकारच्या शिक्षण खात्याकडे संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण आणि संस्कृति संघटनेतर्फें आणखी ४०,००० डॉलर्सच्या किंमतीच्या पुस्तकांचीं कुपन्स आलीं आहेत. दरवर्षीं मिळणारीं २०,००० डॉलर्सचीं कुपन्स त्यापूर्वींच मिळालीं आहेत.

**कोल्हापूर येथील औद्योगिक प्रदर्शन**—डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ह्या संस्थेतर्फें ता. २३ एप्रिल ते ५ मे पर्यंत एक औद्योगिक प्रदर्शन कोल्हापूरला भरविण्यांत येणार आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील महत्त्वाच्या औद्योगिक वस्तू ह्या प्रदर्शनांत ठेवण्यांत येणार आहेत. १५० गाळ्यांची सोय करण्यांत आली आहे.

**ब्रिटनचें सैन्यबल**—ब्रिटनच्या सेनादलाची संख्या सध्या अवघी ३,७६,००० आहे. तीन वर्षांपूर्वीं ही संख्या ८,६२,००० होती. ब्रिटनमध्यें उद्योगधंद्यांना लागणारें मनुष्यबळ कमी असल्यानें लष्कराची संख्या कमी करण्यांत यावी अशा सूचना नेहमीच करण्यांत येत असतात.

**ब्रिटन चीनशीं व्यापारी तह करणार!**—कम्युनिस्ट चीनशीं व्यापारी कराराचीं बोलणीं करण्यासाठी ब्रिटनचे व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ नुकतेंच पेकिंगला गेलें आहे असें समजतें.

**जपानी बोटींची खरेदी**—जपानकडून दोन मालवाहू बोटी घेण्याचें एका हिंदी कंपनीनें ठरविलें आहे, एक टन वजनाला १०० डॉलर्स ह्या भावानें सौदा ठरण्याचा संभव आहे.

**कत्तलखान्याला परवानगी पाहिजे**—हैद्राबाद सरकारनें म्यु. पल हद्दींतील कत्तलखान्यांत परवानगी घेतल्याशिवाय मांसासाठीं जनावरें मारण्यास बंदी केली आहे. ज्या कत्तलखान्यासाठी गुरांच्या डॉक्टराचा दाखला घेऊन परवाना काढला असेल त्यांतूनच ह्यापुढें पशुहत्या करता येईल.

**पंजाब नॅशनल बँक लि.**—वरील बँकेकडे ३१ डिसेंबर १९४९ अखेर ४२ कोटी, ९४ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या. खेळतें भांडवल ५२ कोटी रुपयांवर होतें. बँकेस ३० लक्ष, ४२ हजार रुपये नफा झाला. त्यांतून भागीदारांच्या वाट्यास ५ लक्ष, २० हजार रुपये आले. नोकरवर्गास ८ लक्ष, ४० हजार रु. बोनस मिळाला.


—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी

# खादी मन्दिर

—खादीचें माहेरघर—

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ११ एप्रिल, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांच्या विलिनीकरणाची योजना

### "बड्या प्रस्थां"चे हातीं बँकिंगची मोनॉपोली ?

पंजाब नॅशनल बँकेचे चेअरमन व जनरल मॅनेजर, लाला योधराज, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं भाषण करतांना नेहमींप्रमाणें हिंदी बँकिंगचा विस्तृत आढावा घेतला. फाळणीमुळें निर्माण झालेल्या अडचणी, अन्नपुरवठा, उत्पादनखर्च, व्याजाचे दर, कर, कामगार, भांडवल संचय, इत्यादि प्रश्नांवर त्यांनीं आपले विचार व्यक्त केले. भारतांतील लहान व मध्यम आकाराच्या सर्व बँकांचें दहा–वीस मोठ्या बँकांत विलिनीकरण करण्यांत यावें, असें त्यांनीं प्रतिपादलें. भारतांतील पांचशें संस्थानें सोळा राज्यांत जशीं विलीन झालीं त्याचप्रमाणें ७८ शेड्यूल्ड बँकांतून डझन–दीड डझन बँका शिल्लक रहाव्या, असें त्यांचें म्हणणें आहे. मोठ्या आकाराच्या थोड्या बँका हिंदी बँकिंगची गरज जितकी चांगल्या तऱ्हेनें भागवूं शकतील तितकी लहान आकाराच्या मोठ्या बँका भागवूं शकणार नाहींत, असें त्यांचें मत आहे. मोठ्या बँकांना त्यांचे पैसे ठिकठिकाणच्या मागणीप्रमाणें योग्य प्रमाणांत कार्यक्षमतेनें वांटून देतां येतील, धोरणांत एकवाक्यता राहूं शकेल, सर्व कर्जांना मुख्य कचेरीची मंजुरी लागल्यामुळें स्थानिक व्यवस्थापकांचा त्यांतील वैयक्तिक अनिष्ट संबंध उरणार नाहीं, प्रत्येक अर्जाचा विचार मुख्य कचेरीच्या किंवा रिझर्व्ह बँकेनें घालून दिलेल्या धोरणाप्रमाणें होईल, वगैरे मुद्दे लाला योधराज ह्यांनीं मांडले आहेत. बँकांच्या विलिनीकरणाची त्यांची योजना खालीं दिली आहे.

ज्या बँकांची "पुढारी" म्हणून नियुक्ति होईल, त्यांची एक असोसिएशन बनवावी. ह्या असोसिएशननें आर्थिक धोरण निश्चित करावें. असोसिएशन रिझर्व्ह बँकेचा सल्ला नेहेमी घेत राहील. कर्जाचें धोरण, धंद्याच्या खबरदाऱ्या, ऑडिट, सर्वसाधारण व्यवस्था, नोकरवर्गाशीं संबंध, बँका–बँकांत सहकार्य वाढविणें, इत्यादि प्रश्नांचा असोसिएशन प्रामुख्यानें विचार करील. असोसिएशनच्या देखरेखीखालीं बँकांची इन्स्पेक्शन एकाच समान पद्धतीनें करतां येईल. ह्या इन्स्पेक्शनचे रिपोर्ट रिझर्व्ह बँकेकडे पाठवले, म्हणजे तिला पुनः वेगळी तपासणी मुद्दाम करण्याचें प्रयोजन उरणार नाहीं. ठेवीदारांच्या हिताची रक्षक ही भूमिका पार पाडण्यास अंतर्गत इन्स्पेक्शनचे हे अहवाल व त्यांची छाननी हीं तिला सहाय्यकारक होतील.

भारतांत शेड्यूल्ड बँकांच्या एकूण शाखा २,९२३ आहेत, आणि त्या १,३५० गांवांत पसरलेल्या आहेत. मोठ्या शहरांतच अर्थात् त्यांची दाटी झालेली आहे. १२ प्रमुख शहरांतच ८०० शाखा आहेत ! शेड्यूल्ड बँकांच्या शाखांपैकी २७% शाखा जेथें बँकिंगच्या सोई आहेत अशा गांवांपैकी फक्त १% गांवांत आहेत. ह्या दाटीमुळें अनिष्ट स्पर्धेस वाव मिळत आहे. शहरांतील ह्या शाखांपैकी निम्म्या शाखा बंद करून त्या खेडेगांवी ठिकाणीं हलविल्या तरी शहरांची गैरसोय होणार नाहीं. फाजील शाखा बंद करून त्या योग्य त्या खेडेगांवी प्रदेशांत पद्धतशीर रीतीनें उघडल्या, तर बँकांच्या नफ्यावर फारसा अनिष्ट परिणाम होणार नाहीं; खेडेगांवी मुलुखाचा मात्र फायदा होईल. रूरल बँकिंग चौकशी कमिटीच्या प्रश्नावलीस जीं उत्तरें पाठविण्यांत आलीं आहेत, तीं लक्षांत घेतलीं तर रूरल बँकिंगची आशा सोडूनच द्यावी लागेल. ह्यांतून मार्ग अर्थात् काढलाच पाहिजे.

लाला योधराज ह्यांनीं आपल्या विलिनीकरणाच्या योजनेंतून इंपीरिअल बँक, एक्सचेंज बँका व सहकारी बँका ह्यांना वगळलें आहे. शेड्यूल्ड बँकांच्या एकूण ९४० कोटी रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी ५९७ कोटी रुपयांवर फक्त पांच बड्या बँकांचा अधिकार चालत आहे. ज्या बँकांना विलीन व्हावें लागेल, त्यांवर अवलंबून असलेल्या लोकांचा विलिनीकरणास विरोध होणें स्वाभाविकच आहे. हें विलिनीकरण अर्थातच सध्यांच्या बँकिंग कंपनीज ॲक्टाखालीं होऊं शकणार नाहीं किंवा ऑर्डिनन्सहि त्याला उपयोगाचा नाहीं. भागीदार व ठेवीदार ह्यांच्यांत तशी जागृति होण्यावरच आणि सरदार पटेलांच्या सारख्या पोलादी पुरुषानें ही योजना हातीं घेण्यावरच तिचें यश अवलंबून राहील, असा लाला योधराज ह्यांचा अभिप्राय आहे.

पंजाब नॅशनल बँक ही पांच बड्या प्रस्थांपैकीं एक बँक असल्यानें, तिच्या चेअरमनच्या विचारसरणीस एक प्रकारचें महत्त्व आहे. मोठ्या बँकांचा मध्यम व लहान बँकांकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यानें स्पष्ट होतो. सबंध भारतांत फक्त डझन–दीड डझन बँकाच शिल्लक ठेवण्याची त्यांची कल्पना कितपत व्यवहार्य होईल, हा मोठाच प्रश्न आहे. देशांत अनेक बँका निघाल्या तरी मोठ्या बँकांना त्या बाधक झालेल्या नाहींत. महाराष्ट्रासारख्या प्रदेशांत आजच पर–राज्यीय बँका आपल्या शाखा उघडून, स्थानिक बँकिंगचें क्षेत्रांत मोठा हिस्सा उचलीत आहेत. दहा–वीस बँकांनाच हिंदी बँकिंगची मोनॉपोली द्यावयाची म्हटल्यास, येथील व्यापार व उद्योगधंदे ह्यांस कितपत सहानुभूतिपूर्वक वागवणूक मिळेल, ह्याविषयीं शंका वाटण्याजोगी आहे. लाला योधराज ह्यांच्या योजनेस आज फारसा पाठिंबा मिळण्याजोगा खासच नाहीं. परंतु, मध्यम व लहान आकाराच्या बँकांनींहि संघटना करून आपलें स्थान मजबूत करून ठेवलें पाहिजे, हें मात्र निश्चित.

---

**सक्करच्या धरणाची दुरुस्ती**—सक्कर येथील धरणाला गेल्या वर्षी कांहीं तडे गेल्याचें आढळून आलें होतें. धरणाची दुरुस्ती करण्यासाठी सिंध सरकारनें आतां आधुनिक यंत्र–साहित्य विकत घेण्याचें ठरविलें आहे. धरणाची दुरुस्ती होण्यास दोन वर्षांचा काळ लागेल असा अंदाज आहे.

**बँकांचें एकत्रीकरण**—बेंगाल सेंट्रल बँक, कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कोमिल्ला युनिअन बँक व हुगळी बँक, ह्या चार बँकांनीं रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याप्रमाणें एकत्रीकरण करण्याचें ठरविलें होतें. आतां ही योजना लवकरच अंमलांत आणण्यांत येईल असें समजतें.

## मार्शल योजनेचा अमेरिकन कारखान्यावर परिणाम

प. युरोपांतील राष्ट्रांची युद्धकाळांत फार मोठी औद्योगिक हानि झाली. ही हानि भरून काढून त्यांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी अमेरिकेनें मार्शल योजना जाहीर केली. ही योजना कितपत यशस्वी होत आहे, अगर झाली आहे तें काळच ठरवील. दरम्यान, ह्या योजनेचे विपरीत परिणाम कांहीं अमेरिकन उद्योगधंद्यांना भोगावे लागणार असें दिसतें.

अमेरिकेंतील सुप्रसिद्ध वॉलथॅम वॉच कंपनीला कारखाना बंद करण्याची पाळी आली आहे; आणि ह्याचें कारण स्विट्झरलंड-मधील घड्याळांची अमेरिकेंत करण्यांत येणारी आयात. अमेरिकेच्या वॉचमेकर्स युनिअननें सरकारवर ह्या बाबतींत दोन स्पष्ट आरोप केले आहेत. ( १ ) स्विस घड्याळांच्या आयातीला परवानगी देऊन अमेरिकन घड्याळ कंपन्यांचा सरकारनें विश्वास घात केला आहे. ( २ ) शिवाय कंपनीला अधिक कर्ज देण्यालाही सरकार तयार नाहीं. अशीच परिस्थिति चालू राहिल्यास शस्त्रास्त्रांकरितां सूक्ष्म कालमापन करणारीं घड्याळें तयार करणाऱ्या अवघ्या दोनच कंपन्या अमेरिकेंत शिल्लक रहातील, असा इषारा वरील कंपनीनें अमेरिकन सरकारला दिला आहे. ही कंपनी ज्या गांवांत आहे, तेथें रोजगार मिळण्याची दुसरी कांहीं सोय नाहीं. अशा परिस्थितींत कारखाना बंद झाल्यामुळें १,३०० कामगार बेकार झालेले आहेत.

कंपनीचें म्हणणें असें आहे कीं स्विस घड्याळांच्या स्पर्धेमुळें आपणास कारखाना बंद करावा लागला. १९४८ सालीं अमेरिकेनें ८०,००,००० स्विस घड्याळें आयात केलीं. त्याच वर्षी खुद्द अमेरिकेंत २०,००,००० घड्याळें तयार करण्यांत आलीं. वॉलथॅम कंपनीनें तक्रार केल्यामुळें अमेरिकन सरकारनें स्विस घड्याळांच्या आयातीवर संख्येचें बंधन घातलें. परंतु हें बंधन पुरेसें नाहीं असा युक्तिवाद वॉलथॅम कंपनीतर्फे करण्यांत येण्याचा संभव आहे. स्विस घड्याळांच्या आयातीवरील कर दुप्पट करावा अशी कंपनीची मागणी आहे. परंतु ही मागणी दोन दृष्टींनीं अयोग्य आहे. एकतर आयात कर दुप्पट करणें म्हणजे अकार्यक्षम उद्योगधंद्याला संरक्षण दिल्यासारखें होतें. दुसरें असें कीं, प. युरोपला आपल्या पायावर उभे करण्याच्या अमेरिकेच्या धोरणाशीं आयातीवरील करवाढ विसंगत आहे. अमेरिका आणि स्विट्झरलंड ह्यांच्यापुरताच विचार करावयाचा तर करवाढीचा परिणाम वाईट होईल. आजच स्विट्झरलंड अमेरिकेकडून निर्यातीपेक्षा अधिक माल आयात करीत आहे. अमेरिकेनें आयातीवरील कर वाढविल्यास स्विट्झरलंड अमेरिकेकडून घेत असलेला शेतीचा माल कमी करील.

सारांश, युरोपांतून माल आयात केल्याशिवाय तर गत्यंतर नाहीं आणि आयात केल्यास देशी उद्योगधंद्यांना ती मारक होते. अशीच परिस्थिति इतर बऱ्याच उद्योगधंद्यांबद्दल उद्भवली तर अमेरिकन सरकार शृंगापत्तींत सांपडेल ह्यांत शंका नाहीं.

---

**रशिआ हिरे घेत नाहीं**—औद्योगिक हत्यारांना लागणारे हिरे रशिआ अलीकडे विकत घेत नाहीं असें समजतें. शस्त्रास्त्रें निर्माण करण्यासाठी जीं सूक्ष्मतम हत्यारें लागतात त्यांच्यासाठीच हिरे मुख्यतः लागतात. रशिआनें आपल्याला पुरतील इतके हिरे ह्यापूर्वीच घेतले असतील, असा तर्क करण्यांत येत आहे.

### दि बेळगांव बँक लि, बेळगांव

वरील बँकेच्या हिशेबाचें वर्ष ३० जून अखेर संपत होतें, परंतु बँकिंग कंपनीज कायद्याच्या २९ व्या कलमाप्रमाणें तें आतां ३१ डिसेंबर अखेरीचें करण्यांत आलें असून त्याप्रमाणें १-७-१९४९ ते ३१-१२-१९४९ अखेरचे हिशेब तयार करण्यांत आले आहेत. बँकिंगच्या दृष्टीनें हा काळ चलतीचा नसतो तरी सुद्धां ह्या मुदतींत बँकेचें तिच्या खर्चापेक्षां उत्पन्न ३७,७८४ रुपयांनीं जास्त भरलें. गेल्या तीन वर्षांचा इनकमटॅक्स भरावयाचा होता तो ह्या मुदतीच्या नफा-तोटा खातीं खर्च टाकल्यावरहि ७५७ रु. वाढावा उरला, तो पुढील हिशेबांत ओढण्यांत आला आहे. बँकेचें वसूल भांडवल ६ लक्ष रु. असून तिच्या रिझर्व्ह फंडांत १,४१,६४३ रु. आहेत. ठेवींचा रक्कम ५८,५९,४७१ रु. आहे. १५,३०,३६५ रु. कॅश, डिस्कौंट केलेलीं व खरीदलेलीं १५,५१,९५६ रु. चीं बिलें, १९,७९,८४३ रु. इनव्हेस्टमेंट, २६,०३,९१८ रु. कर्जे, असे ताळेबंदांतील प्रमुख आकडे आहेत. बँकेचें कमिशनचें व एक्सचेंजचें उत्पन्न चांगलें आहे. बँक २२ शाखांच्या द्वारा जनतेची सेवा करीत आहे. (चेअरमन: श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी. व्हाइस चेअरमन: श्री. जे. डब्ल्यु. कलघटगी. मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी.)

### दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि., बेळगांव

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,०७० | कॅश | ६,३८,८९२ |
| रिझर्व्ह फंड | ५९,०९१ | इन्व्हेस्टमेंटस | ३,४२,८३२ |
| ठेवी | १७,८९,६९७ | कर्जे | ९,३८,४०६ |
| इतर ठेवी | २१,१४२ | बिलें | १,४५,५५१ |
| नफा | २८,६९३ | इतर जिंदगी | २९,४२९ |

सुप्रीम बँकेस १९४९ अखेरच्या वर्षी २८,६९३ रु. निव्वळ नफा झाला. ५,७५० रु. रिझर्व्ह फंड, ८,८०० रु इन्कमटॅक्स रिझर्व्ह, १,००० रु. बॅड डेट फंड, अशी वाटणी करून उरलेल्या रकमेंतून क्यु. प्रे. भागांस ६½% करमाफ व ऑर्डिनरी भागांस ५% डिव्हिडंड देण्यांत येईल. बँकेनें इतर बँकांकडून कर्जाऊ रक्कम कांहींहि घेतलेली नाहीं. बँकेनें १,०५,१४० रु. व्याजाचे व डिस्कौंटचे मिळवले आणि कमिशनची मिळकत ८,४९२ रु. झाली. ५४,९१७ रु. व्याज दिलें. बँकेच्या कोल्हापूर आणि आरोंदा येथें शाखा आहेत. बँकेची वार्षिक सभा दिनांक १६ एप्रिल रोजीं होणार आहे. (चेअरमन: श्री. एस. जी. पंत-बाळेकुंद्री, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. एस. के. सामंत.)

### दि न्यू ओरिएंटल बँक लि., कोल्हापूर

वसूल भांडवल १,००,००० रुपये, ठेवी १,३८,८०७ रुपये, कॅश ४७,८२४ रुपये, कर्जे १,७४,५२९ रु., इतर जिंदगी १२,३४७ रुपये, नफा २,१०४ रुपये, असे ह्या बँकेच्या १९४९ अखेरच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे आहेत. एकूण ताळेबंद २,४७,२६७ रुपयांचा आहे. बँकेनें व्याज डिस्कौंट, इत्यादींपासून १३,१२० रु. उत्पन्न मिळवून ३,३८९ रुपये व्याज दिलें. १ रु. ९ आ.% डिव्हिडंडसाठीं १,५६७ रुपयांचा विनियोग करण्यांत आला. गेल्या वर्षी बँकेकडील ठेवींत आणि खेळत्या भांडवलांत वाढच झालेली दिसून येते. (चेअरमन: श्री. जी. एस. कुरबेट्टी, तंबाखू व्यापारी, निपाणी. मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. बी. जी. देगांवकर. मॅनेजर: श्री. बी. बी. पाटील.)

## कंपनी कायदा व सुधारणा

### मॅनेजिंग एजन्टस—व्यवस्थापक

( लेखकः—श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम, मुंबई—पुणें )

सरकारनें प्रसिद्ध केलेल्या पत्रिकेंत मॅनेजिंग एजन्टस्‌चे बाबत २७ सूचना मांडल्या आहेत. त्या आपल्या ता. ९-११-१९४९ चे ‘ अर्थ ’ चे अंकांत आपण प्रसिद्ध केल्या आहेत. वाचकांनीं त्या पुन्हां एकदां डोळ्याखालून घालाव्यात. त्यावर मॅनेजिंग एजन्टस असलेले व्यापारी व कारखानदार यांनीं आपलीं मतें प्रसिद्ध करणें अगत्याचें होतें. तथापि अजून कोणी आपल्या पत्रांतून त्याबाबत लिहिलें नाहीं. म्हणूनच साधारण वाचकासाठीं मॅनेजिंग एजन्टस् बाबत कांहीं विचार खाली देत आहे. मुख्यतः औद्योगिक प्रगतीचे व शेअर-होल्डर्सचे हिताचे दृष्टीनें हें लिहीत आहे.

### एवढ्या भयंकर दुरुस्त्या कां आवश्यक ?

आपलेकडे सध्यांचा कंपनी कायदा १९१३ सालीं आला व त्यांत १९३६ सालीं दुरुस्त्या आणि सुधारणा करण्यांत आल्या. त्यावेळीं मॅनेजिंग एजन्टस्‌च्या कारभारावरील नियंत्रणें १९१३ सालापेक्षा पुष्कळच कडक अशीं करण्यांत आला, तथापि तीं सुद्धां १९४९ सालीं अपुरीं पडूं लागलीं. ह्याबाबत मुंबईतील शेअर होल्डर्स असोसिएशननें खूप तलास करून कांहीं कंपन्यांच्या मॅनेजिंग एजन्टसच्या कारवायांवर प्रकाश पाडला व सरकारचें व जनतेचें लक्ष वेधून घेतलें. त्याचप्रमाणें, स्टॉक एक्सचेंज ( शेअर बाजार ) चे कमिटीनेंहीं मॅनेजिंग एजन्टसचे कारभारावर आहेत त्यापेक्षां पुष्कळ कडक नियंत्रण असावें असें मत आपल्या निवेदनांत दाखल केलें. सोलापूर मिलचे बाबत सरकारनें नेमलेल्या इन्स्पेक्टर्सनीं केलेल्या रिपोर्टांमुळें जनतेचें लक्ष ह्या पद्धतीकडे विशेष वेधलें गेलें. जनतेपुढें सरकारनें, कंपनी कायद्यातज्ज्ञ अशा दोघा कायदेपंडितांनीं सुचविलेल्या २७ सूचना विचारासाठी पुढें मांडल्या. आपला ९-११-१९४९ चा अंक पुन्हा एकदा वाचकांनीं चाळून पहावा, म्हणजे या सूचना वा दुरुस्त्या मॅनेजिंग एजन्टस या संस्थेवर काय परिणाम करतील हें लक्ष्यांत येईल. या संस्थेच्या मुळावरच घाव घालतील अशा त्या आहेत. म्हणून त्यावर आपलेकडील सर्व विचारी व अनुभवी तज्ज्ञांनीं मत प्रसिद्ध करून साधकबाधक चर्चा करणें फार अगत्याचें व महत्वाचें आहे. जे आज मॅनेजिंग एजन्टस आहेत त्यांनींहि पुढें येऊन सरकारकडे व जनतेपुढें आपलें म्हणणें मांडणें अवश्य आहे, व ज्या कारणामुळें इतक्या भयंकर सुधारणा करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, तीं कारणें दुरुस्त करण्यांची त्यांनीं तयारी दाखविली पाहिजे.

युद्ध समाप्तीपर्यंतचे काळांत व त्यापूर्वी ‘ मॅनेजिंग एजन्टस् ’ या संस्थेनें फार मोठें व उपयुक्त कार्य केलेलें आहे. तें करणें या संस्थेमुळेंच शक्य झालें आहे, व त्याबाबत फारसें दुमत नाहीं. सध्याचे काळांत, युद्धपूर्वकाळापेक्षां, जगांतील देश एकमेकांचे जवळ आले आहेत. विमानवाहतुकीमुळें काळाचें अंतर कमी झालें आहे. चिमुकले कारखाने जगाचे व्यापारांत यापुढें फारसा टिकाव धरूं शकणार नाहींत व यापुढें काढावयाचे कारखाने, उद्योग, फार मोठ्या प्रमाणावर निघाले पाहिजेत. भांडवलाची भाषा लाखावरून कोटीवर आली आहे. या पातळीवर यापुढें मोठमोठे कारखाने व उद्योगधंदे, एक सरकारनें तरी काढावे, किंवा कोट्यधीशांनीं. म्हणून ह्या परिस्थितींत, ‘ मॅनेजिंग एजन्सी ’ ह्या संस्थेवर सर्वांनीं विचार करून मतें पुढें मांडावींत.

### खऱ्या तळमळीचे थोर उद्योगपती

एकादा मोठा कारखाना किंवा उद्योगधंदा काढण्यापूर्वी प्राथमिक अशी चौकशी करावी लागते. त्या त्या धंदाशीं निगडित व अनुभवी अशा पेढ्या तें काम अंगावर घेतात व स्वतःचा पैसा खर्चून आराखडा तयार करतात. त्यासाठीं लाखो रुपये खर्च होतात. मग भांडवल गोळा करण्याचा प्रश्न. तें जमण्यास, व्यापार व उद्योग यांत मुरलेल्या व अनुभव असलेल्या उद्योगपतींची पत, कीर्ति व धारिष्ट लागतें व मगच अशीं प्रचंड कार्यें होऊं शकतात. तेव्हां देशाच्या आर्थिक व औद्योगिक उन्नतीसाठीं अशा अनुभवी उद्योगपतींचिकडे देशाचें मार्गदर्शन देणें योग्यच होय. याबाबत जुना अनुभव आशादायक आहे. जुने खानदानी पेढीवाले उद्योगपती हें ओझें उचलण्यास मागें तयार झाले व पुढें होतील. टाटांचें घराणें वा संस्था हें एक नमुनेदार व आदर्श उदाहरण आहे. जेथें कोटींत भाषा तेथें एकट्या दुकट्या उद्योगपतीला किंवा पेढीला तें ओझें भारी होतें व म्हणून प्राथमिक चौकशीनंतर ते ‘ कंपनी ’ काढून, जनतेचें आर्थिक सहाय्य घेतात. ज्यांनीं प्राथमिक पहाणी केली, जुळवाजुळव केली व त्यासाठीं स्वतःचे पैसे खर्च केले, ते जर मॅनेजिंग एजन्टस् म्हणून पुढें झाले तर त्यांत वावगें व व्यवहारास सोडून असें कांहीं नाहीं. मेहनत घेतली त्याचा मोबदला त्यांना मिळाला, तर त्यांत अयोग्य काय आहे ? पूर्वी असे थोर पुरुष झाले, म्हणून आज आपणांस मोठाले वीज उत्पन्न करण्याचे कारखाने, समुद्रावर वाहतुक करणाऱ्या शिपिंग कंपन्या, केमिकलसचे कारखाने, मोठाल्या गिरण्या, साखरेचे व सिमेंटचे कारखाने या देशांत दिसत आहेत. ते काढणाऱ्यांची बुद्धि खोटी नव्हती. स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं देशभक्त ज्या तळमळीनें तुरुंगांत गेले, त्याच तळमळीनें जमशेट टाटा सारखे थोर लोक आपले स्वदेशी उद्योगधंदे काढण्यासाठी व वाढविण्यासाठीं, परकी राज्यांतील प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत उद्योग व मेहनत करीत होते. या थोर लोकांनीं प्राथमिक पहाणीसाठी लाखो रुपये खर्च केले आहेत. ते सर्व थोर लोक ( परलोकवासी व हयात ) देशाची उन्नति करणारे. तेव्हां अशा थोर लोकांनीं जर स्वतःकडे ‘ मॅनेजिंग एजन्सी ’ घेऊन भांडवल गोळा करण्याची, दैनंदिन कारभार बघण्याची व ‘ तज्ज्ञ ’ मंडळींचा सल्ला व देखरेख देण्याची जबाबदारी घेतली व त्यासाठी योग्य मोबदला घेऊन असे कारखाने व उद्योग यशस्वी केले तर ते देशाला एक भूषणच. असे उद्योगपती आपल्यांत आहेत, महाराष्ट्रांत आहेत, हें आपलें भाग्य. भावी काळ आशादायक वाटतो तो एवढ्यांचसाठी. या थोर लोकांचे मनांत देशाला व भांडवल देणाऱ्या देशबंधूंना लुबाडण्याचें स्वप्नांतसुद्धां यावयाचें नाहीं. अशा प्रवृत्तीचे थोर लोक या देशांत, या महाराष्ट्रांत, अधिकाधिक जन्मास येवोत.

### दुरुस्ती जरुर का झाली ?

तथापि “स्वार्थ व लोभ” आपला पगडा कांहीं जणांवर बसवतो व मग तो वरचढही होतो. लढाईचे काळांत व त्यानंतर, ‘ विपुल ’ फायदा घेण्याची सवय झाली व कांहींजण तर कोणत्याही मार्गानें पैसा—धन गोळा करण्यास प्रवृत्त झाले. इन्कमटॅक्स कमिटीनें एका डॉक्टरचें उदाहरण दिलेलें वाचकांपुढें आहेच. युद्धकाळांत मुख्य लक्ष ‘ विजयावर ’ केंद्रित केल्यामुळें परकी सरकारकडून या प्रवृत्तीला आळा घातला गेला नाहीं, व १९४२ चे सुमारास, त्या वेळेच्या विदेशी सरकारला, शक्य तितके कमी कर द्यावयाचे व त्यासाठी हिशोब विशिष्ट तऱ्हेनें ( कमी नफा दाखविण्याचे दृष्टीनें ) ठेवण्याचे व्यापारी आणि कारखानदार

यांनीं सुरू केलें व या छपवाछपवीचे धंदे गिरविणें, स्वराज्य मिळविल्यावरही, त्यांनीं चालू ठेवलें. हें खरें दुखणें. अशा व्यापाऱ्यांनीं आणि कारखानदारांनीं, तज्ज्ञांच्या सल्ल्यानें, जितके फावलें तितकें करून व शक्य त्या पळवाटांचा उपयोग करून आपल्या तुंबड्या भरल्या. हें अजीर्ण होईपर्यंत. म्हणून तितक्याच हिरीरीनें २७ सूचना पुढें आल्या. अशा व्यापाऱ्यांनीं आणि कारखानदारांनीं नवे उद्योग सुरू केले. कंपन्या काढल्या. आपल्याला सर्वस्वी फायदेशीर असे करार कंपन्यांचे बरोबर केले. त्यांच्या गोड थापांना जनता फसली व आपला पैसा त्यांचे हवाली करून शेवटीं पस्तावली. आजच्या काळांत "कंपनी" केल्यावर मन मानेल तसें वागतां येतें हें पाहून, कांहीं एजन्टसनीं व्यवहार केले व त्यामुळेंच, ज्या कायद्याचा जास्तींत जास्त दुरुपयोग केला गेला त्या 'कंपनी कायद्यांत' सुधारणा करण्याची जरूरी उत्पन्न झाली व तशी सूचना पुढें आली.

### दुरुस्ती मारक होऊं नये

या सूचना मॅनेजिंग एजन्टसना मारक होणार काय? पहिल्या दोन सूचनांमुळें, यापुढें नवीन उद्योगधंदे काढण्यास अनुभवी व तज्ज्ञ पेढ्या पुढें येऊं शकण्याचा संभव नाहीं व तसें झाल्यास ती देशाच्या औद्योगिक प्रगतीचे मार्गावर एक घोंडच पडल्यासारखें होणार आहे.

मॅनेजिंग एजन्टस हे **व्यवस्थापक** व शेअरहोल्डर्सचे प्रतिनिधी, डायरेक्टर्स हे **कारभारी**, हें नातें प्रस्थापित करण्यास, पाहिजे तेवढे फेरफार करावेत. मॅनेजिंग एजन्टसनीं डायरेक्टरांचे देखरेखीखालीं दैनंदिन कारभार करावा, त्यास अडचण पडूं नये, व कारखाने, व्यापार उद्योग, यांची जोपासना व धंद्याची वाढ करण्यास सवड व उत्तेजन मिळेल असा कायद्याचा पसारा असावा. अडचणी आणणारा असूं नये. सरकारी नियंत्रणाखालीं सर्व उद्योगधंदे व व्यापार आणणें कित्येक वर्षें शक्य नाहीं. पाश्चिमात्य देशांतही हें शक्य झालेलें नाहीं, व आपलेकडेहि त्याचप्रमाणें. तेव्हां, जी सुधारणा करावयाची ती 'मारक' असूं नये— 'तारक' असावी. सरकारचें व भांडवल देणाऱ्या जनतेचें रक्षण व्हावें, लोक लुबाडले जाऊं नयेत, एवढ्याचपुरतीं बंधनें असावींत. त्यामुळें वाढ खुंटूं नये, प्रगति थोपविली जाऊं नये, या तत्त्वावर सुधारणा अगर बंधनें घातलीं जावीं.

याबाबत, मोठे व छोटे व्यापारी, कारखानदार व त्यांचे संघ आपापल्या अडचणी व सूचना सरकारपुढें मांडतीलच. पण 'जनता' जागृत झाली असल्यामुळें तिच्यापुढेंही त्यांनीं 'अर्थ' मधून व इतर पत्रांतून आपला दृष्टिकोन मांडावा. त्याचप्रमाणें हें युग जरी लहान लहान कारखान्यांना फारसें चांगलें नसलें, तरी असे कारखाने अस्तित्वांत असल्यामुळें त्यांनींहि पुढें होऊन आपल्या अडचणी लोकांपुढें ठेवाव्यात.

व्यापार, उद्योग, कारखाने, वगैरेंना भांडवल पाहिजे. त्यासाठी जे चालक असतील त्यांनीं पत व मान सांभाळला पाहिजे. स्वार्थापुढें व लोभामुळें जग व कायदा तुच्छ मानणाऱ्या लोकांचे हातीं सूत्रें गेल्यास अशा लोकांच्या कारखान्यांना, धंद्यांना, उद्योगांना वाईट काळ येतो व त्यांना भांडवल पुरविणाऱ्या जनतेचें व त्याबरोबर देशाचें नुकसान होतें, प्रगति खुंटते; तेव्हां अशा स्वार्थी व लोभी लोकांचें फावणार नाहीं येवढ्यापुरतीं बंधनें यावींत व कायद्यानें व्यवस्था व्हावी.

एकाद्या पेढीनें किंवा कंपनीनें, प्रास्ताविक स्वरूपाचें कामकाज, पहाणी व व्यवस्था केलेली असल्यास त्यांना त्यांच्या कल्पनेचा व खटपटीचा योग्य असा मोबदला मिळणें न्याय्य आहे. अशा पेढीला मॅनेजिंग एजन्ट नेमल्यास, योग्य अटीवर त्यांना कंपनीचा कारभार, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे देखरेखीखालीं करता यावा. त्याचा फायदा देशाला, भागीदारांना व त्यांना होईल. पण 'कंपनी' काढून आपल्यालाच फायदेशीर होतील असे करार आपल्या हस्तक डायरेक्टर्सकडून कंपनीचे माथीं मारावयाचे व मग भांडवल गोळा करून आपला फायदा करून घ्यावयाचा असा एक धंदाच झाला आहे. शेअर खपविणाऱ्या दलालांच्या गोड थापांना जनता फसून त्यांना पैसा पुरविते व शेवटीं फसते. तेव्हां, पूर्ण भांडवल जमल्यावरच मॅनेजिंग एजन्सीचे करार पूर्ण व्हावेत व नंतर जनरल मीटिंगमध्यें अधिकृतपणें स्वीकारले तर कंपनीवर बंधनकारक व्हावेत. सध्याचे कायद्यांतील एक मोठी पळवाट म्हणजे "मॅनेजिंग एजन्सी करार." त्याबाबत सरकारनें योग्य बंदोबस्त केल्यास पन्नास टक्के काम होईल. स्टॉक एक्सचेंज (शेअर बाजार) चे कमिटीनें सुचविलें आहे कीं, मॅनेजिंग एजन्सी कराराचा कायद्यानेंच एक स्टॅन्डर्ड फॉर्म ठरवून यावा. या सूचनेंत बरेंच तथ्य आहे.

याबाबत भांडवल गुंतविणारांना एक सूचना करावीशी वाटते. नव्या सुधारणा येण्यास १९५१, कदाचित् १९५२ साल उजाडेल. तोंपर्यंत नवीन शेअर्स घेणारांनीं कंपनीची 'आर्टिकल्स' व 'मेमोरॅंडम', त्याचप्रमाणें 'मॅनेजिंग एजन्टस्' किंवा 'मॅनेजिंग डायरेक्टर' यांचे कंपनीशीं झालेले करार, काळजीपूर्वक तपासून, स्वतःची खात्री झाल्यावरच त्या कंपनीचे शेअर्स घ्यावेत. त्याचप्रमाणें जे डायरेक्टर त्या कंपनीचे कारभाराशीं आत्मीयतेनें वागणारे असतील व ज्यांना त्या कंपनीच्या धंद्याची माहिती आहे, असे डायरेक्टर असतील व जे थोडेफार स्वतंत्र वृत्तीनें वागणारे असतील, असें बोर्ड पाहूनच मग शेअर्स घेण्याबाबत विचार करावा.

### मॅनेजिंग एजन्सी पद्धतींतील दोष तेवढे काढा

सत्तावीस सूचनांपैकी एक व दोन या सूचनांमुळें, व २७ व्या सूचनेप्रमाणें मॅनेजिंग एजन्सी पद्धति एकाद्या धंद्यांतून काढून टाकण्याचा अधिकार आपलेकडे घेण्याचा सरकारचा हक्क या तीन, या पद्धतींवर फार मोठा आघात करणाऱ्या सूचना पुढें आल्या आहेत. आजवर या पद्धतीनें देशाचा फायदा झाला आहे हें सरकार व टीकाकार कबूल करतात. तेव्हां ज्यामुळें, या पद्धतींत शिरून कांहीं "इन्टेलिजंट" (हुषार) व्यक्तींनीं तिचा दुरुपयोग केला ते खाचखळगे भरून काढणें व ती पद्धति चांगल्या वळणावर आणणें हा खरा मार्ग; ती नामशेष करणें हा नव्हे. ही पद्धति बंद केल्यास, 'कंपनी'चा दैनंदिन कारभार चालविणें, एकाद्या 'मॅनेजिंग डिरेक्टर'कडे किंवा 'मॅनेजर'कडे यावाच लागेल व तो जर कंपनीचे विरुद्ध कारवाया करूं लागला तर तो दोष उत्पन्न होणारच. मग आहे ही 'पद्धति' कायम ठेवून, कीं ज्या पद्धतीमुळें, भांडवल आलें, मोठाले धंदे स्थापन झाले व एकंदरींत देशाची, परकीय सत्तेखालीं सुद्धां, बरीच चांगली प्रगति झाली, अशा या 'पद्धतींत' योग्य सुधारणा करण्यांत याव्यात. 'मॅनेजिंग एजन्टस्'ना फक्त 'व्यवस्थापक' एवढाच अधिकार असावा व त्यांचे व्यवहार कार्यक्षम व सचोटीनें होत राहतील असें कायद्यांत असणें हा खरा उपाय. त्या दिशेनें विचार व्हावा. म्हणजे, एजन्टसचे कंपनीबरोबरचे करार कंपनीला, सरकारला व भांडवल पुरविणाऱ्या जनतेला लुबाडणारे नसावेत; त्यांचेवर बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सतत नजर राहील व स्वतः बोर्ड कार्यक्षम राहील अशी

व्यवस्था अंमलांत यावी; कर्जे काढणें, करार करणें, वगैरेवर बोर्डाची शिक्कामोर्तबें व्हावींत; व बोर्ड हें एजन्टसूचे आहारीं निरनिराळ्या दडपणांनीं जाणार नाहीं अशी त्याची रचना असावी. वाटेल त्यानें उठावें, कंपनी काढावी, मोळ्या लोकांकडून, दलालांचे मार्फत पैसे गोळा करावेत, चार दिवस मोटारी उडवाव्यात, अशा जातीच्या कंपन्या काढण्यास आळा घालण्याचे अधिकार सरकारला व रजिस्ट्रारला असावेत, ऑडिटर्स हे शेअरहोल्डर्सचें हित निरपेक्ष बुद्धीनें पाहूं शकतील व आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं शकणार नाहींत अशीं बंधनें त्यांचेवर घातलेलीं असावींत, वगैरे महत्त्वाच्या बाबींकडे सरकारनें व जनतेनें लक्ष द्यावें.

त्याचप्रमाणें, पहिल्या प्रथम खरोखरीच सच्चा पण पुढें लोभाला बळी पडेल असा व्यवस्थापक कांहीं करूं शकणार नाहीं, हें शेअरहोल्डर्सनीं व सरकारनें पहाण्यापुरत्या तरतुदी कायद्यांत असाव्यात. तसेंच एकाद्याहि शेअरहोल्डरला बेकायदेशीर व्यवहारांना आळा घालता येईल अशी व्यवस्था कायद्यांत व्हावी. तेंव्हां, ही "पद्धति," कीं जिनें मागें फार मदत दिली व थोड्याफार प्रमाणांत देशाची प्रगतीच केली, ती पूर्णतः नामशेष करूं नये, तींत सुधारणा व्हावी व तिचा गैरफायदा कोणाला घेता येऊं नये, एवढें जनतेनें व सरकारनें व खुद्द एजन्टसनीं करावें. शेठ मुरारजी गोकुळदास, शेठ जमशेटजी टाटा, यासारखे निःस्वार्थी, कष्टाळू व धाडसी व्यापारी व कारखानदार या देशांत व या महाराष्ट्रांत निपजोत व या महाराष्ट्राला संपत्ति व वैभव आणण्याचें कार्य करोत, ही प्रार्थना.

---

**मुंबई हायकोर्ट निवाडा**

## मॅनेजिंग एजंटांच्या कमिशनचें देणें केव्हां निर्माण होतें

पोदार सन्स लि. हे पोदार मिल्स आणि शक्ति मिल्स ह्यांचे मॅनेजिंग एजंटस होते. मॅनेजिंग एजन्सीच्या कराराप्रमाणें, त्यांना नफ्याचा १०% कमिशन मिळावयाचें होतें. भागीदारांनीं वार्षिक हिशेब मंजूर केले कीं त्यांना तें आदा व्हावें, असा करार होता. पोदार मिल्सचा ताळेबंद भागीदारांनीं ११ मार्च, १९४४ रोजी मंजूर केला आणि पोदार सन्स लि. ला १५ मार्च, १९४४ रोजीं कमिशनची रक्कम मिळाली. शक्ति मिल्सचा ताळेबंद २३ मार्च १९४४ रोजीं मंजूर झाला आणि पोदार सन्स लि. ला १२ एप्रिल, १९४४ रोजीं कमिशनची रक्कम मिळाली.

१९४४-४५ ह्या इनकम टॅक्सच्या वर्षासाठी १ ऑक्टोबर १९४२ ते ३० सप्टेंबर १९४३ ह्या मुदतीमधील उत्पन्नावर पोदार सन्स लि. वर कराची आकारणी करण्यांत आली. परंतु त्यांचें म्हणणें असें, कीं त्यांना कमिशनची रक्कम सप्टेंबर १९४३ पूर्वी मिळावयाची नव्हती व मिळालीहि नाहीं. म्हणून त्या मुदतीच्या हिशेबांत ती जमा धेता येणार नाहीं. पोदार सन्स लि. नें ह्या मुद्यावर हायकोर्टाकडे विचारणा केली. "इन्कम टॅक्सच्या आकारणीच्या मुदतींत पोदार सन्स लि. नें काम करून कमिशन मिळवलें; तें प्रत्यक्ष केव्हां देण्यांत आलें हा मुद्दा महत्त्वाचा नसून तें मिळण्याचा हक्क केव्हां निर्माण झाला, हा मुद्दा महत्त्वाचा आहे." असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला. म्हणून, १ ऑक्टोबर १९४२ ते ३० सप्टेंबर १९४३ ह्या मुदतीमधीलच तें उत्पन्न आहे असें धरावें, असें हायकोर्टानें मत दिलें.

# रॉकफेलर फौंडेशनचें प्रचंड कार्य

## दातृत्वाचा जनतेच्या उद्धाराकडे प्रभावी विनियोग

(सह्याद्रि, एप्रिल १९५० मधील श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या लेखाचा दुसरा भाग)

### व्यापक उद्देश

रॉकफेलर फौंडेशनच्या ट्रस्टींनीं ह्या तत्त्वास अनुसरून, पैसे देतांना त्याच्या विनियोगाविषयीं जाचक अटी घालण्याचें टाळलें आहे आणि पुढच्या पिढ्यांना बांधून टाकलेलें नाहीं. कांहीं ठराविक वर्षांनीं, मूळ उद्देशाऐवजीं त्याच्या अगदीं नजीकच्या उद्देशावर, व्यवहार्य ठरेल त्याप्रमाणें, खर्च करण्याची सवलत देण्याचें ट्रस्टींचें धोरण आहे. रॉकफेलर फौंडेशनचें कार्यक्षेत्र जागतिक स्वरूपाचें आहे, नफा मिळविण्याची तिचेवर जबाबदारी नाहीं, दुसऱ्याकडून ती पैसे मागांत नाहीं, तिला राजकीय किंवा धार्मिक हितसंबंधाचें बंधन नाहीं, कोणत्याहि सरकारची ती हस्तक नाहीं आणि चिरंतन टिकण्याची तिची महत्त्वाकांक्षा नाहीं. १९४८ अखेर फौंडेशननें भांडवलापैकीं १२½ कोटी डॉलर खर्चले आहेत.

### फलदायी कार्यक्षेत्राची निवड

फौंडेशनचें ध्येय व प्रचलित जागतिक अमर्याद गरजा ह्यांचा विचार केला, तर फौंडेशनची संपत्ती मोठी असूनहि फारच कमी पडणार हें उघड आहे. ह्यासाठी, आवश्यकापुरतें कार्यक्षेत्र आखून घेणें आवश्यक ठरतें. (१) ज्या गोष्टींस अन्य ठिकाणाहून मदत मिळणार नाहीं, अशांना प्रामुख्यानें फौंडेशननें सहाय्य करावें. (२) हें सहाय्य प्रारंभीं देऊन, गोष्टीची उपयुक्तता पटल्यावर ती पुढें इतर साधनांचे सहाय्यानें चालू रहावी. (३) तात्कालिक दुःखनिवारणाचें काम हातीं घेऊं नये; त्या कामाचें अगत्य सर्वांना सहज पटूं शकतें. ह्या गरजेस फौंडेशनचा पैसा पुरूं शकणार नाहीं. (४) मनुष्याच्या हितसंवर्धनास पोषक अशा ज्ञानाचा प्रसार करून त्याचा उपयोग त्या कामीं करणें हें फौंडेशननें अग्रेसर कर्तव्य ठरविलें आहे. अशा कामीं लहान रकमा खर्च केल्या, तरी परिणामीं त्या व्यापक आणि टिकाऊ हिताच्या ठरण्याची आशा असते. पेनिसिलीनचा इतिहास हेंच दर्शवितो. शास्त्रीय संशोधनास उपलब्ध केलेल्या लहान-सहान मदतींतूनच ह्या महत्त्वाच्या औषधाचा उदय झाला आणि त्यामुळें इतरहि महत्त्वाचे पदार्थ सापडूं शकले.

ज्ञानाचें संवर्धन व त्याचा हितकारक उपयोग, हें उद्दिष्ट मर्यादित असलें, तरीहि त्याची व्याप्ति कांहीं लहान नाहीं आणि उपलब्ध फंड व व्यवस्था खर्च ह्यांचा विचार करता, त्याहूनहि मर्यादित क्षेत्रांतच काम करणें अपरिहार्य होतें. स्वतः प्रत्यक्ष काम न करतां, चांगल्या कामात प्रोत्साहन व मदत करणें हेंच श्रेयस्कर ठरतें. रॉकफेलर फौंडेशन पैसा देते, परंतु प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी सरकारें, विद्यापीठें, इत्यादींवरच सोपवावी लागते. तज्ज्ञ शास्त्रज्ञांच्या अभावामुळेंहि कामास मर्यादा घातली जाते. शास्त्रीय ज्ञानाचा विचार करतांना, इतर ज्ञानाकडेहि दुर्लक्ष करून भागत नाहीं. जमिनीचा धूप वांचविणें हें अधिक महत्त्वाचें का मलेरियाचा प्रतिबंध अधिक महत्त्वाचा, असे प्रश्न उपस्थित होतात. पण जगापुढें आज खरे महत्त्वाचे प्रश्न तरी कोणते उभे आहेत? लोकसंख्या, वहातुक व सहकार्य ह्या तीन प्रश्नांचा व त्यांस अनुलक्षून येणाऱ्या इतर प्रश्नांचा विचार फौंडेशन प्राधान्यानें करीत आहे.

लोकसंख्येचा प्रश्न विश्वव्यापी, कायम सतावणारा आणि अग्र महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय, वर्गीय व जातीय कलहांच्या तो बुडाशीं आहे. जगाची लोकसंख्या आणि उपलब्ध साधनें ह्यांचा मेळ बसतो किंवा नाहीं, तो कसा बसवितां येईल, इत्यादि प्रश्न त्यांत उपस्थित होतात. लोकसंख्येचे घटक अधिक चांगले कसे होतील, हाहि मुद्दा महत्त्वाचा आहे.

### शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार

मनुष्याची उत्पादन शक्ति वाढविण्याचा प्रश्नहि कमी महत्त्वाचा नाहीं. ह्या सर्व बाबतींत फौंडेशननें मोठ्या प्रमाणावर संशोधनास व प्रत्यक्ष कृतीस चालना दिलेली आहे. नैसर्गिक संपत्तीचा अधिकांत अधिक उपयोग करण्यासाठी जागतिक भांडवलाची वाढ झाली पाहिजे. ह्या भांडवलाचें स्वरूप मोठालीं धरणें, वीज उत्पादनाचीं गृहें, अशा प्रकारचेंच असण्याचें कारण नाहीं. लहान लहान सुधारणा करूनहि उत्पादन वाढवितां येईल. अमेरिकेसारखा देश मोठें भांडवल उभारूं शकेल, परंतु मागासलेल्या देशांना लहान भांडवली योजनांपासूनच प्रारंभ करावा लागेल. लोकसंख्येचा प्रश्न सोडवितांना परस्परावलंबनासहि योग्य स्थान दिलें पाहिजे. पूर्व गोलार्धांतील लोकांचेकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. त्यांतूनच वहातुक आणि सहकार्य ह्यांचा उगम होतो. वहातुक म्हटली, म्हणजे रेल्वे, मोटार, विमान वहातुक नजरेसमोर येते. फार तर टेलिफोन, तार, इत्यादींपर्यंत आपली धाव जाते. परंतु, शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व त्याची देवघेव हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत आणि त्यांचे अभावीं जगाचा एकसूत्री विचार करणेंहि कठीण आहे. शास्त्रीय ज्ञानाचा जगभर फैलाव केल्यानें वहातुकींत खऱ्या अर्थानें सुधारणा घडून येणार आहे. हा फैलाव भाषांच्या द्वारांच घडून येणार. म्हणून, रॉकफेलर फौंडेशनचें भाषांचा अभ्यास, राज्यशास्त्र, इतिहास, इत्यादि विषयांकडेहि लक्ष आहे.

### अमेरिकेचें ऐश्वर्य आणि जगाचें दारिद्य

आजच्या जगांत अमेरिकेसारखें धनसंपन्न राष्ट्र कोणतेंच नाहीं. ह्या समृद्धीची कांहींशी मजेदार माहिती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. इतर जगांत अन्नाचा तुटवडा भासत असतांना अमेरिकेंत गहूं, लोणी, कापूस, प्रून्स (एक प्रकारचें फळ) ह्यांची रेलचेल आहे. प्रून्स फळाच्या सुकाळाविषयीं तर असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, अमेरिकन कॉंग्रेसच्या प्रत्येक सभासदाला ३२२९ सालापर्यंत न्याहारीसाठी पुरतील इतकीं फळें आज पिकलीं आहेत. गव्हाचीही तीच तऱ्हा. अमेरिकेच्या सर्व गरजा भागून जगांतील प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला आणि मुलाला १२ पाव देतां येतील इतका वरकड गहूं आज अमेरिकेंत आहे. अमेरिकेंतील प्रत्येक १५ वर्षाखालील मुलाच्या जन्मदिवशीं पुढील पंधरा वर्षे एक 'केक' द्यावयाची म्हटलें तरी ती भाजण्यास पुरेल इतकें लोणी अमेरिकेंत आहे; आणि प्रत्येक अमेरिकन स्त्रीला ५४ पोषाख करता येतील इतका कापूस पिकलेला आहे. इतकी रेलचेल असतांना सुद्धा खुद्द अमेरिकन नागरिकांपैकी सर्वांनाच त्यांचा आस्वाद घेता येत नाहीं. कारण, ह्या वस्तू घेण्यासाठीं लागणारे डॉलर्स प्रत्येकाजवळ असतातच असें नाहीं. अमेरिकेंतील ४६ लाख बेकार आणि त्यांच्यावर अवलंबून असणारीं माणसें ह्यांना तरी हे जीवनावश्यक पदार्थ सहज आणि पुरेसे प्राप्त होणार नाहींत. जगांतील इतर राष्ट्रांनाहि डॉलर्सच्या अभावीं आपल्या प्राथमिक गरजा सुद्धा भागविता येत नाहींत. उलटपक्षीं, अशा राष्ट्रांना अमेरिकेकडून मुख्यतः शस्त्रास्त्रांची मदत मात्र पाठविण्यांत येत आहे.


बेडेकर लोणचीं वापरा

दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार — मॅनेजर
म. अं. दप्तरदार, बी. ए. — चेअरमन.

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.